# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मालमत्ता कर संकलन विभाग

दि. २६/०४/२०२२

## जाहीर आवाहन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार शहरातील इमारत व जमीनींवर महानगरपालिका कर आकारणी करुन मालमत्ता कर वसूल करीत आहे. सद्यस्थितीत थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ कराधान नियम मधील नियम ५१ अन्वये आयुक्तांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार “अभय योजना २०२२-२३” लागू करण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. **“अभय योजना २०२२-२३” चा कालावधी:-**

“अभय योजना २०२२-२३” चा कालावधी हा दि.२५/०४/२०२२ ते दि.३१/०७/२०२२ असा राहील.

२. **योजनेची व्याप्ती :-**

- “अभय योजना २०२२-२३” अंतर्गत ६०० चौ. फुट पर्यंत क्षेत्रफळ असलेल्या ज्या अधिकृत निवासी मालमत्ता धारकांचा दि.२४/०४/२०२२ रोजी पर्यंत थकीत मालमत्ता कर असेल अशा सर्व करदात्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.
- “अभय योजना २०२२-२३” नियम ४१ प्रमाणे आकारण्यात येणारा दंड (शास्ती/व्याज) माफीचा तपशील खालीलप्रमाणे असेल

नियम ४१ खालील शास्ती (व्याज) माफीचा तपशील

| अ.क्र. | कालावधी | जमा करायाच्या रक्कमेचा तपशील | नियम ४१ प्रमाणे आकारण्यात येणारा दंड (शास्ती/व्याज) माफीचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | २५ एप्रिल २०२२ ते ३१ जुलै २०२२ | थकीत मालमत्ता कराची रक्कम +५०% दंड नियम क्र.४१ अन्वये रक्कमेचा एक रक्कमी भरणा केल्यास | ५०% |

**३. योजनेचे लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय असतील:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम मधील नियम ४१ अन्वये आकारण्यात आलेला दंड (शास्ती/व्याज) रक्कमेसाठी सदरची अभय योजना लागू राहील. इतर कोणत्याही रक्कमेत माफी देण्यात येणार नाही.

**४. अभय योजने अंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कम:-**

- सदर योजना वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील ६०० चौ. फुट पर्यंत क्षेत्रफळ असलेल्या अधिकृत निवासी मालमत्ता धारकांसाठी लागू राहील .
- सदर योजना वर नमूद केलेल्या कालावधीत मालमत्ता कराचा भरणा केलेल्या रक्कमांना लागू राहील.
- या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. योजना सुरु करण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

**५. अभय योजने नुसार करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इ. अभय योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी लागू असणाऱ्या अटी:-**

- ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा या कालावधीचे कोणतेही प्रलंबित असलेले अपील, पुर्ननिरिक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा. न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहिजे.
- जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुर्ननिरिक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा. न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका दाखल केली तर अभय योजनेनुसार संबंधित कालावधीसाठी दिलेली सवलत काढून घेण्यात येतील.
- दि.२५/०४/२०२२ ते दि.३१/०७/२०२२ या कालावधीत थकीत मालमत्ता कराची रक्कम + ५०% दंड (नियम क्र.४१ अन्वये) रक्कमेचा एक रक्कमी भरणा केल्यास उर्वरीत ५०% दंड (नियम क्र.४१ अन्वये) माफ करण्यात येईल.
- अभय योजनेच्या कालावधीमध्ये कोणत्याही कारणास्तव धनादेश न वढल्यास मालमत्ता धारक या अभय योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही. तथापि, अभय योजनेच्या कालावधीत पुनश्चः दंडासहीत एक रक्कमी रोख रक्कमेचा भरणा केल्यास मालमत्ता धारक हा अभय योजनेचा लाभास पात्र राहील.
- अभय योजनेचा लाभ घेऊन करचा भरणा केल्यांनतर सदर भरणा रक्कमे संदर्भात कोणत्याही प्राधिकरणापुढे/ न्यायाधिकरणापुढे कोणत्याही कारणास्तव दावा दाखल करता येणार नाही.

मालमत्ता कर ऑनलाईन पद्धतीने भरणेकरिता www.vvcmc.in या संकेतस्थळावर अथवा UPI (Phone Pe, Paytm, Google Pay etc.) व्दारे तसेच आपल्या जवळील कर भरणा केंद्रावर लवकरात लवकर कर भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

मालमत्ता कर विभाग
वसई-विरार शहर महानगरपालिका